आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१२ जुलै २०२४ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या मुंबई दौऱ्यावर/ २९ हजार ४०० कोटी रुपये खर्चाच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांचं करणार उद्घाटन आणि लोकार्पण

- २५ जून संविधान हत्या दिन म्हणून घोषित

- नेपाळमधे प्रधानमंत्री पुष्पकमल दहल यांनी बहुमत गमावलं

- महाराष्ट्र विधानपरिषदेच्या द्वैवार्षिक निवडणुकीत महायुतीचे सर्व ९ तर महाविकास आघाडीचे २ उमेदवार विजयी

**आणि**

- राज्य विधिमंडळ अधिवेशनात आज शेवटच्या दिवशी अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा संपली

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या मुंबईत येणार असून त्यांच्या हस्ते ५२हजार ३०० कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्चाच्या विविध प्रकल्पांचं भूमिपूजन आणि लोकार्पण होणार आहे. गोरेगाव इथल्या नेस्को प्रदर्शन केंद्रात रस्ते, रेल्वे आणि बंदर क्षेत्राशी संबंधित २९ हाजार ४०० कोटी रुपये खर्चाच्या प्रकल्पांचं लोकार्पण आणि पायाभरणी मोदी यांच्या हस्ते होईल. गोरेगाव- मुलुंड रस्त्यावरचा जुळा बोगदा, ठाणे - बोरिवली दरम्यानचा बोगदा तसंच, नवी मुंबईत तुर्भे इथं कल्याण यार्ड रिमॉडेलिंग आणि गती शक्ती मल्टी मॉडेल कार्गो टर्मिनल या प्रकल्पांची पायाभरणी प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होईल. त्यानंतर प्रधानमंत्री लोकमान्य टिळक टर्मिनसवरच्या नवीन फलाटाचं लोकार्पण करतील. मुख्यमंत्री युवा कार्य शिक्षण योजनेचं उद्घाटन

देखील प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होणार असून संध्याकाळी ते इंडीयन न्यूजपेपर सोसायटीच्या नव्या इमारतीचं उद्घाटन करतील.

**<><><><><>**

२५ जून हा दिवस **संविधान हत्या दिवस** म्हणून पाळण्याचा निर्णय केंद्र सरकारने जाहीर केला आहे. १९७५ साली याच दिवशी तत्कालीन प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी जाहीर केली होती, त्याच्या स्मरणार्थ हा दिवस पाळण्यात येणार आहे. भारताचं संविधान पायदळी तुडवलं गेलं तेव्हा काय घडलं होतं, याची आठवण करून देणारा हा दिवस असेल असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी याविषयी बोलताना म्हणाले. आणीबाणीमुळे ज्या लोकांना त्रास झाला त्यांच्यासाठी ही आदरांजली ठरेल, असंही प्रधानमंत्री आपल्या समाजमाध्यमावरल्या संदेशात म्हणाले.

तर लोकशाहीचं संरक्षण करण्यासाठी लढलेल्यांचा सन्मान करण्यासाठी हा निर्णय घेतल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सांगितलं. हा दिवस पाळल्याने नागरिकांच्या मनात व्यक्तिस्वातंत्र्याची ज्योत तेवत राहील, आणि देशाच्या लोकशाहीच्या  रक्षणाची जाणीव कायम राहील असंही शहा म्हणाले.

**<><><><><>**

असमानता रोखण्यासाठी शिक्षण ही सर्वात प्रभावी परिवर्तनशील यंत्रणा आहे, असं प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आज मुंबईत केलं. नरसी मोनजी व्यवस्थापकीय शिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांना ते मार्गदर्शन करत होते. या संस्थेनं गेल्या अनेक वर्षांपासून देशाचं भविष्य घडवण्याच्या कामात मोठा हातभार लावल्याबद्दल त्यांनी प्रशंसोद्गार काढले. वैदिक काळापासून भारताला उच्च शिक्षणाची मोठी परंपरा असून प्राचीन भारतातल्या महाविद्यालयांनी समाजाला दिशा देणारी मूल्यं जपली आहेत, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

नेपाळमधे प्रधानमंत्री पुष्प कमल दहल ‘प्रचंड’ संसदेत बहुमत सिद्ध करण्यात अपयशी ठरले आहेत. १९४ संसद सदस्यांनी ठरावाच्या विरोधात मतदान केलं तर ६३ सदस्यांनी ठरावाच्या बाजूने मतदान केलं. बहुमत सिद्ध करण्यासाठी प्रचंड यांना १३८ मतांची आवश्यकता होती.

<><><><>

देशाचं औद्योगिक उत्पादन, खनिकर्म आणि वीज क्षेत्राच्या चांगल्या कामगिरीमुळे वाढल्याचं दिसून आलं आहे. मे महिन्यात औद्योगिक उत्पादन सूचकांक ५ पूर्णांक ९ टक्क्यांनी वधारला तर एप्रिल महिन्यात तो ५ टक्के दराने वाढला होता. गेल्या वर्षी याच कालावधीत वाढीचा दर ५ पूर्णांक ७ टक्के इतका होता.

<><><><>

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज ६२२ अंकांची वाढ झाली आणि तो ८० हजार ५१९ अंकांच्या विक्रमी उंचीवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीमधे १८६ अंकांची वाढ होऊन तो २४ हजार ५०२ अंकांवर बंद झाला.

<><><><>

विधान परिषदेच्या आज झालेल्या ११ जागांसाठीच्या निवडणुकीत महायुतीचे सर्व ९ उमेदवार विजयी झाले. महाविकास आघाडीच्या ३ पैकी २ उमेदवारांना विजय मिळवता आला. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या पाठिंब्याने निवडणूक लढवणारे शेकापचे जयंत पाटील या निवडणुकीत पराभूत झाले.

विधान परिषदेच्या ११ जागांसाठी १२ उमेदवार रिंगणात होते. त्यासाठी आज विधान सभेच्या सर्व २७४ आमदारांनी मतदान केले. त्यातून भाजपकडून पंकजा मुंडे, परिणय फुके, सदाभाऊ खोत, योगेश टिळेकर आणि अमित गोरखे विजयी झाले. राष्ट्रवादी काँग्रेसकडून राजेश विटेकर आणि शिवाजीराव गर्जे यांनी

शिवसेनेकडून माजी खासदार कृपाल तुमाने आणि भावना गवळी यांनी विजय मिळवला.

महविकास आघाडीतल्या काँग्रेसकडून प्रज्ञा सातव आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार मिलिंद नार्वेकर या निवडणुकीत विजयी झाले.

**<><><><><>**

महाराष्ट्रात आज विधीमंडळाच्या पावसाळी  अधिवेशनाचा शेवटचा दिवस होता. दोन्ही सभागृहांमधे आज प्रदीर्घ चर्चा झाली.  राज्य सरकारने लोकांना कल्याण करण्यासाठी विविध लोकोपयोगी निर्णय घेतले. त्यासाठी कर्ज घ्यावी लागली असं प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधानसभेत केलं. अंतिम आठवडा प्रस्तावावर उत्तर देत होते. मराठा आरक्षणावर विरोधिकांची भूमिका दुटप्पी आहे. आरक्षणाच्या विरोधात याचिका करणारे काँग्रेसचे लोक असल्याचा आरोप त्यांनी केला.  मुंबईतील सर्व पुनर्विकासाची काम लवकर पूर्ण व्हावी यासाठी आम्ही अनेक निर्णय घेतले. झोपडपट्ट्यांचा वरचा मजला विकसित करण्यासाठी क्लस्टर प्रमाणे लाभ देणार असल्याचं ते म्हणाले. मुंबई विमातळावरील गर्दी कमी करण्यासाठी पालघर जवळ मुंबई महानगर क्षेत्रातल्या तिसऱ्या विमानतळाच्या उभारणीची चाचपणी करत आहोत असं आज मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत जाहीर केलं. अंमली पदार्थ, बेकायदा  हॉटेल यावर कारवाई करण्याचे आदेश सरकारने दिले आहेत. हे प्रकार बंद होत नाही तोपर्यंत कारवाई सुरू राहील असं मुख्यमंत्री म्हणाले.

**<><><><><>**

दोन वर्षात राज्यातल्या महायुती सरकारनं रखडलेले प्रकल्प मार्गी लावत सर्वच क्षेत्रात लक्षणीय कामगिरी केली असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानपरिषदेत सांगितलं. अंतिम आठवडा प्रस्तावासह इतर प्रस्तावांवरील चर्चेला ते उत्तर देत होते.

सिंचन, मागेल त्याला सौरपंप, ८४ लाख कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचे चुकारे,या कामांचा उल्लेख फडणवीस यांनी केला.

धारावीचा पुनर्विकास करताना तिथल्या व्यावसायिकांनाही व्यवसाय करण्यासाठी तिथेच जागा देण्यात येईल, असं फडणवीस यांनी सभागृहाला आश्वस्त केलं.

राज्यात गंभीर गुन्ह्यांमध्ये तीन टक्क्यांपेक्षा अधिक घट झाली असून दोषसिद्धीचं प्रमाण ४५ टक्क्यांपर्यत पोहोचल्याचं त्यांनी सांगितलं.

येत्या विधानसभा निवडणुकीत राज्याची जनता महायुतीला पुन्हा एकदा संधी देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसंच, विरोधकांनी दिलेल्या सूचना आणि त्यांनी केलेलं काम याबद्दल त्यांचे आभार मानले.

**<><><><><>**

महायुती सरकारने सरकारी तिजोरीत खडखडाट केला, कर्ज आणून नव्या योजना आणल्या असा आरोप विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी आज विधानसभेत अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा करताना केला. मराठा आरक्षणासंदर्भात सगे सोयऱ्याना आरक्षण देण्याविषयी सरकारने भूमिका स्पष्ट करावी. त्यानंतर आम्ही आमची भूमिका जाहीर करू असं ते म्हणाले. राज्यात सरकारने दावा केल्याप्रमाणे रोजगानिर्मिती झालेली नाही. लोकांच्या या फसवणुकीला जनतेच्या दरबारात तोंड द्यावं लागेल, असं वडेट्टीवार म्हणाले.

चातुर्वर्ण्य या राज्यात पुन्हा येता कामा नये, सरकारने याची गांभीर्याने दखल घेऊन संविधानानुसारच ते चालवले गेले पाहिजे अशी मागणी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे गटनेते जयंत पाटील यांनी आज विधानसभेत केली.

गुजरातचे ड्रग्ज राज्यात आणून , प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार वाढवून , राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था धोक्यात आणण्याचे काम राज्य सरकारनं राज्याची प्रतिमा खराब केली आहे असा आरोप नाना पटोले यांनी यावेळी केला.

**<><><><><>**

इसिस संघटनेच्या दोन कार्यकर्त्यांचा औरंगाबाद प्रारूपातल्या दहशतवादी कारवाया प्रकरणात सहभाग असल्याबद्दल आज राष्ट्रीय तपास संस्थेनं त्यांच्यावर आरोपपत्र दाखल केलं. देशभरातल्या युवकांची दहशतवाद प्रकरणात सहभागी होण्यासाठी नियुक्ती करण्याचं काम त्यांच्याकडे होतं , असं यात नमूद केलं आहे.

**<><><><>**

विम्बल्डन टेनिस स्पर्धेच्या पुरुष एकेरी उपांत्य फेरीत आज दोन सामने होत आहेत. गतविजेता कार्लोस अल्काराझ आणि पाचवा मानांकित दानील मेदवेदेव यांच्यात एक सामना सुरु असून,

दुसऱ्या सामन्यात नोवाक जोकोविच बरोबर लॉरेन्झो मुसेट्टी याची लढत आहे.

**<><><><>**

केरळात तिरुवनंतपुरममध्ये कॉलराच्या आणखी पाच रुग्णांची नोंद झाली आहे, यामुळे कॉलराची लागण झालेल्या रुग्णांची संख्या सातवर गेली आहे. कॉलराचा प्रसार रोखण्यासाठी केरळ राज्याच्या आरोग्य विभागानं प्रतिबंधात्मक उपायांची अंमलबजावणी केली होती. तिरुअनंतपुरममधल्या नेयट्टींकारा इथल्या शाळेच्या वसतिगृहात राहणाऱ्या व्यक्तींना सगळ्यात आधी कॉलराची लागण झाल्याची नोंद करण्यात आली होती. हे वसतिगृह तात्पुरतं बंद करण्यात आलं असून अधिकारी इथल्या परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेऊन आहेत. तसंच साथीचं नेमकं कारण शोधण्यासाठी पाण्याच्या नमुन्यासोबतच विविध नमुन्यांचं परीक्षण केलं जात आहे.

**<><><><>**

येत्या पाच दिवसांत देशाच्या नैऋत्य भागात तसंच पूर्वेकडील राज्यात मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. मध्य

महाराष्ट्र,कोकण, गोवा, कर्नाटक, गुजरात आणि तेलंगणाच्या काही भागातही मुसळधार पाऊस होण्याचा अंदाज वर्तवला आहे.

//<><><><><>//